# आदेश

गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २००६.

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१.

क्रमांक : आरटीआर ०३२०००/सी.आर.१४७/भाग-१/पोल ५अ.-- मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ५(ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२००० अधिक्रमित करून याव्दारे महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "पोलीस शिपाई" या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे, जसे :-

१. या नियमांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,-

(अ) "विभाग" म्हणजे शासनाचा गृह विभाग ;

(ब) "महासंचालक" म्हणजे पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ;

(क) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ड) "पोलीस दल" म्हणजे मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ३ अन्वये विहित करण्यात आलेले पोलीस दल.

**३.** **(१)** पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय, शैक्षणिक व शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

**(अ) वय -**

कमीतकमी १८ वर्षे जास्तीत जास्त २५ वर्षे.

(मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चतम वयोमर्यादेत सूट देय राहील.)

**(ब) शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**(क) शारीरिक पात्रता :-**

| | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|
| (i) उंची | १५५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. |
| (ii) छाती | -- | न फुगवता ७९ सें.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

**(२) <u>शैक्षणिक व शारीरिक पात्रतेत द्यावयाची सुट</u>**

**(अ) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद**

**अ) शैक्षणिक अर्हता :-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी

झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरती करता पात्र ठरतील. मात्र असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाहीत.

**ब) शारीरिक पात्रता :-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार व नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :-

१) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरूष उमेदवारांसाठी.

२) छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

**क)** या नियमातील उप खंड (अ) व (ब) नुसार विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता व शारीरिक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या उमेदवारांच्याबाबतीत शिथिल करण्याचे अधिकार महासंचालक यांना राहतील.

**ड)** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील पोलीस भरतीच्या वेळी स्थानिक आदिवासी भागात बोलली जाणारी बोली भाषा (Local Tribal dialect) अवगत असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**(ब) पोलीस बँड :**

**(अ) शैक्षणिक अर्हता :-** बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी) उत्तीर्ण झालेले उमेदवार देखील भरतीकरीता पात्र ठरतील.

**(ब) शारीरिक पात्रता :-** बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत या नियमाच्या उपनियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहित केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार महासंचालक यांना रहातील :-

(i) उंची .. २.५ सें.मी.

(ii) छाती .. २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून.

**(क)** (i) बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

(ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बॅन्ड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(iii) पोलीस बॅन्ड पथकासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्येही बजावणे आवश्यक राहील.

(iv) पोलीस बॅन्ड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बॅन्ड पथकात बदलीस पात्र ठरतील.

**(क) खेळाडू प्रवर्ग**

आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरूष व महिला खेळाडुंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहील.

**(ड) अनुकंपा तत्वावरील भरती**

पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणांमुळे वैद्यकीय अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे किंवा जे सेवेत असतांना मृत पावले आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच मुलास किंवा मुलीस पोलीस भरतीसाठी बोलविता येईल. अशा उमेदवारांसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :-

(अ) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरूष उमेदवारांसाठी

(ब) छाती : २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

**(३) वैद्यकीय तपासणी**

उमेदवारांची वैद्यकीय तपासणी प्राधिकृत शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधतेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग व महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकीय चाचण्यांचा समावेश असेल.

४. **(१) शारीरिक चाचणी (१०० गुण):-** जे उमेदवार विहित शारीरिक व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असतील अशा उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण १०० गुणांची असेल :-

**(अ) पुरूष उमेदवार**

| | | |
|---|---|---|
| (अ) १०० मिटर धावणे | .. | २५ गुण |
| (ब) ८०० मिटर धावणे | .. | २५ गुण |
| (क) १० पुल अप्स | .. | १० गुण |
| (ड) लांब उंडी | .. | २० गुण |
| (इ) गोळा फेक | .. | २० गुण |
| **एकूण** | **..** | **१०० गुण** |

**(ब) महिला उमेदवार**

| | | |
|---|---|---|
| (अ) २०० मिटर धावणे | .. | २५ गुण |
| (ब) ३ कि.मी. चालणे | .. | २५ गुण |
| (क) लांब उंडी | .. | २५ गुण |
| (ड) गोळा फेक (४ कि.ग्रॅ.) | .. | २५ गुण |
| **एकूण** | **..** | **१०० गुण** |

**(२) लेखी चाचणी (७५ गुण):-**

(अ) जे उमेदवार शारीरिक पात्रता चाचणी किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्ग निहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्ग निहाय उमेदवारांना ७५ गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

(ब) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

(i) अंकगणित;

(ii) सामान्यज्ञान व चालू घडामोडी;

(iii) निबंध लेखन.

**(३) मुलाखत चाचणी (२५ गुण):-**

(अ) लेखी चाचणीत किमान ५०% गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधून गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमूद केलेल्या प्रवर्ग निहाय पदसंख्येच्या १:८ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना मुलाखत चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

(ब) मुलाखत चाचणी प्रत्येक घटकामध्ये महासंचालक यांनी गठीत केलेल्या मुलाखत घेणाऱ्या मंडळाकडून घेण्यात येईल.

(क) शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यांचे गुण एकत्र केल्यानंतर, गुणवत्तेनुसार उमेदवारांना जाहिरातीत नमूद केलेल्या प्रवर्गनिहाय पदांच्या १:८ या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यांचे गुण एकत्र केल्यानंतर, सदरच्या प्रमाणकानुसार प्रवर्गनिहाय शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळालेले आहेत तेवढे गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांना मुलाखत चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**स्पष्टीकरण** :- लेखी चाचणी नंतर, शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यांचे गुण एकत्रित करुन जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:८ या प्रमाणानुसार प्रवर्गनिहाय उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर गुणांच्या एकत्रिकरणानंतर अनुसूचित जाती प्रवर्गातील ८० (१० x ८) उमेदवार व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ४० (५ x ८) उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ८० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत मुलाखतीसाठी पात्र असतील. तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ४० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळाले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत मुलाखतीसाठी पात्र असतील.

(ड) मुलाखतीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल, जसे :-

(i) उमेदवाराचे सर्वसाधारण व्यक्तिमत्व ;

(ii) क्रीडा, एन.सी.सी. अथवा तत्सम कार्यक्षमता ;

(iii) इतर विशेष कार्यक्षमता उदा. वाहन चालविण्याचे ज्ञान, संगणक हाताळण्याचे ज्ञान अथवा अन्य तांत्रिक विषयावरील प्रशिक्षण किंवा उच्च शिक्षण.

**(४)** मुलाखत घेणारे मंडळ या नियमाच्या पोटनियम (१), (२) व (३) मध्ये नमूद केलेल्या तीन निकषांवरुन तयार करण्यात आलेल्या निकालांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील.

**५.** पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदाच्या भरतीसाठी संबंधित सेवायोजन कार्यालय किंवा समाज कल्याण अधिकारी किंवा जिल्हा सैनिक बोर्ड किंवा आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांच्या संबंधित कार्यालयाकडून तसेच सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी भाषेतील मोठ्या प्रमाणावर प्रसारण असलेल्या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून तसेच प्रसार माध्यमातून प्रसिध्दी देऊन उमेदवारांची नावे / अर्ज मागविण्यात येतील. याव्यतिरिक्त भरतीबाबतची माहिती पोलीस वेबसाईट आणि पोलीस कार्यालयातील नोटीस बोर्डवर दिली जाईल. तसेच रेडीओ, दुरदर्शन आणि रोजगार वार्तापत्रात दिली जाईल. राज्यात सर्व पोलीस घटकांमध्ये एकाचवेळी भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल. महासंचालक हे भरती प्रक्रियेचा दिनांक निश्चित करतील. यासाठीचे अर्ज सर्व पोलीस आयुक्त/ जिल्हा पोलीस अधिक्षक / समादेशक, राज्य राखीव पोलीस बल / तालुका पोलीस ठाणे यांच्या कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील.

**६. आरक्षण :**

**(१) खेळाडू प्रवर्ग :-**

(अ) (i) पोलीस शिपाई पदाच्या भरतीसाठी उपलब्ध पदांच्या ५% पदे खेळाडूंसाठी राखीव असतील.

(ii) नियम ३ (२) (क) अन्वये देण्यात आलेल्या सुटीच्या अधिन राहून, खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या शारीरिक, शैक्षणिक व इतर पात्रता पूर्ण करणे अनिवार्य असेल.

**(ब) पात्रता :-**

(i) खालील नमूद खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावर भाग घेतलेला असावा. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा सहभागांमध्ये शालेय स्तरावरील राष्ट्रीय स्पर्धा, सबज्युनियर नॅशनल (१७ वर्षाखालील), ज्युनियर नॅशलन (१९ वर्षाखालील), युथ नॅशनल (२१ वर्षाखालील) व सिनियर नॅशनल स्तरावरील स्पर्धांचा समावेश असेल.

(ii) राज्यस्तरावरील क्रीडा स्पर्धेत (आंतरजिल्हा) खालील नमूद क्रीडा प्रकारांमध्ये पदक प्राप्त केलेले असणे आवश्यक राहील.

**<u>खेळांचे प्रकार -</u>**

| | |
|---|---|
| (१) आर्चरी (धर्नुविद्या) | (२) ॲथलेटिक्स व क्रॉस कंट्री |
| (३) ॲक्वेटिक्स | (४) बॅडमिंटन |
| (५) बॉक्सिंग | (६) बास्केट बॉल |
| (७) जिम्नॅस्टिक्स | (८) हॅण्ड बॉल |
| (९) खो-खो | (१०) ज्युडो |
| (११) कब्बडी | (१२) रोईंग |
| (१३) लॉन टेनिस | (१४) शुटींग |
| (१५) वेटलिफ्टींग | (१६) टेबल टेनिस |
| (१७) व्हॉलिबॉल | (१८) तायक्वांडो |
| (१९) कुस्ती | (२०) हॉकी |
| (२१) बिलियडर्स् आणि स्नूकर | (२२) फुटबॉल |
| (२३) कराटे | (२४) पॉवर लिफ्टींग |
| (२५) बॉडी बिल्डींग | (२६) क्रिकेट |
| (२७) कॅनॉईंग आणि कयाकिंग | (२८) रग्बी |

(क) राज्य / अखिल भारतीय आंतरविद्यापीठ / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांबाबत मान्यताप्राप्त क्रीडा संघटना अथवा प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा त्यांचे जिल्हा प्रतिनिधी यांच्याकडून करुन घेणे आवश्यक राहील.

(२) **महिला :-** पोलीस शिपाई पदांवरील भरतीकरीता उपलब्ध असलेल्या एकूण पदांच्या ३०% पदे महिलांसाठी राखीव असतील. सदर आरक्षण शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/५/२००१ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल.

(३) **गृहरक्षक दल (Home Guards) :-** पोलीस शिपाई पदांवर नियुक्ती करताना एकूण पदांच्या ५% पदे होमगार्डमध्ये कमीत कमी ३ वर्ष इतकी सेवा झालेल्या व या नियमांनुसार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या व विहित वयोमर्यादेतील होमगार्डसमधून भरण्यात येतील.

(४) माजी सैनिक, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त व इतर विविध घटकांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आरक्षण लागू राहील.

(५) या नियमात विहित करण्यात आलेल्या प्रवर्गातील उमेदवारांना पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक राहील आणि या पदासाठी शारीरिक चाचणी, लेखी चाचणी आणि मुलाखत चाचणीमध्ये विहित केलेले गुण मिळवावे लागतील.

**७.** पोलीस शिपाई या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तिला, उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

**८.** नियम ३, पोटनियम (२), खंड (अ), उपखंड (अ) याच्या अधिनतेने पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

९. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधित परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये तो परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीतील वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय असणार नाहीत.

१०. पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवाराची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

११. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड**
**शासनाचे सह सचिव.**

प्रति,
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधिक्षक.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
सामान्य प्रशासन विभाग, कार्या-१२, मंत्रालय, मुंबई.
विधी व न्याय विभाग (ब शाखा), मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

# ORDER

**Home Department**
**Mantralaya, Mumbai- 400 032.**
**Dated the 16th May, 2006.**

**Bombay Police Act, 1951**

No. RTR-032000/C.R.147/Part-1/POL-5A-- In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Bombay Police Act, 1951 (Bom. XXII of 1951), and of all other powers enabling it in this behalf, and in supersession of the Police Constables (Recruitment) Rules, 2000, the Government of Maharashtra hereby makes the following rules regulating recruitment to the post of Police Constable in the Police Force under the Home Department of the Government of Maharashtra, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2006.

**2.** In these rules, unless the context requires otherwise:-

*(a)* "Department" means the Home Department of the Government;

*(b)* "Director General" means the Director General and Inspector General of Police, Maharashtra State, Mumbai;

*(c)* "Government" means the Government of Maharashtra;

*(d)* "Police Force" means the Police Force constituted under section 3 of the Bombay Police Act, 1951 (Bom. XXII of 1951).

**3.** *(1)* A candidate for selection to the post of Police Constable in the Police Force shall be required to possess qualifications as follows, namely:

*(A)* **Age:** – Minimum 18 years, maximum 25 years.

(Maximum age limit in respect of Backward Class candidates shall be relaxable as per Government policy in this regard laid down from time to time.)

*(B)* **Educational qualification:--** Should have passed the Higher Secondary School Certificate Examination (XII[th] Standard) conducted by a Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965), including any other examinations declared by Government to be equivalent thereto.

*(C)* **Physical qualification :-**

| | Female | Male |
|---|---|---|
| *(i)* **Height** | Shall not be less than 155 centimetres. | Shall not be less than 165 centimetres. |
| *(ii)* **Chest** | ..... | Shall not be less than 79 centimetres deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimetres. |

*(2)* **Relaxations in educational and physical qualifications**

*(A)* **Special provisions for Naxal-affected areas**

*(a)* **Educational qualification:--** Candidates belonging to the Scheduled Tribes category, children of Police Informants, Police Patils and Policemen who are killed or seriously injured in Naxalite attacks or operations against Naxalites and have passed VII$^{th}$ standard examination and are residing in areas notified by the Government as Naxalite areas shall also be eligible for recruitment on the condition that such a candidate shall not be entitled to transfer outside the said Naxalite areas.

*(b)* **Physical qualifications:** Relaxations for candidates belonging to the Scheduled Tribes category, children of Police Informants, Police Patils and Policemen who are killed or seriously injured in Naxalites attacks or operations against Naxalites and who are residing in the areas notified by the Government as Naxalite areas are enumerated to the extent as set out below:-

*(1)* Height : 2.5 centimetres for male and female candidates.

*(2)* Chest : Measurement not required.

*(c)* The powers of relaxation in educational and physical qualifications prescribed in sub-clauses *(a)* and *(b)* above in respect of candidates residing in the Naxalite areas notified by the Government shall lie with the Director General.

*(d)* In the Naxalite areas notified by the Government, preference will be given to the candidates having knowledge of one of the local tribal dialects.

**(B) Police Band**

*(a)* **Educational qualification:-** Candidates who have passed Secondary School Certificate Examination (X$^{th}$ Standard) conducted by a Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) shall be eligible for recruitment.

*(b)* **Physical qualification:-** The Director General may relax the physical qualifications prescribed in sub-clauses *(i)* and *(ii)* of clause *(C)* of sub-rule *(1)* of this rule in favour of candidates who appear for recruitment in the Police Band to the extent as set out below:-

***(i)* Height : 2.5 centimetres**

***(ii)* Chest : 2 centimetres deflated and 1.5 centimetres expanded.**

*(c) (i)* Knowledge of instruments of brass band and experience in playing of musical instruments is necessary for recruitment in the Police Band.

*(ii)* Wherever feasible, an officer from Defence Service Bands may be included in the Selection Committee exclusively for recruitment in the Police Band.

*(iii)* Police personnel recruited in the Police Band will also have to perform other police duties at the Police Head-quarters.

*(iv)* Police personnel recruited in the Police Band will not be eligible for transfer to executive duties but will be eligible for inter-district transfer in the same cadre i.e. in a Band unit.

*(C)* **Sports category**

Relaxation in the required height by 2.5 centimetres shall be given to the sportspersons who fulfill the required eligibility criteria..

*(D)* **Recruitment on compassionate ground**

One son or daughter of a policeman who has been missing or has been retired on compassionate ground on the basis of medical certificate due to ill health or has died while in service may be called for the police recruitment and he or she may get the following relaxations in respect of physical qualifications, namely:-

*(a)* **Height : 2.5 centimetres for male and female candidates.**
*(b)* **Chest : 2 centimetres deflated and 1.5 centimetres expanded for male candidates.**

*(3)* **Medical fitness**

The medical fitness shall be certified by a Government Medical Officer authorized in this behalf. The medical test shall consist of tests for squint-eye, colour blindness, knock-knees, flat-foot and skin and chest diseases and any other medical tests prescribed by the Director General from time to time.

**4.** *(1)* **Physical test (100 marks):--** The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for a physical fitness test. The physical test will be of a total 100 marks as follows, namely:-

*(A)* **Male candidates**

| | |
|---|---|
| *(a)* 100 metres running | 25 marks |
| *(b)* 800 metres running | 25 marks |
| *(c)* 10 pull-ups | 10 marks |
| *(d)* Long jump | 20 marks |
| *(e)* Shot put | 20 marks |
| **Total** | **100 marks.** |

*(B)* **Female candidates**

| | | |
|---|---|---|
| *(a)* | 200 metres running | 25 marks |
| *(b)* | 3 km. walking | 25 marks |
| *(c)* | Long jump | 25 marks |
| *(d)* | Shot put (4 Kg) | 25 marks |
| | **Total** | **100 marks** |

**(2) Written test ( 75 marks):-**

*(A)* Candidates securing a minimum of 50% marks in the physical fitness test shall be eligible to be called to appear for a written test of 75 marks in the ratio of 1:15 of vacancies advertised in the respective categories.

*(B)* The written test will include the following subjects, namely :-

*(i)* arithmetic;
*(ii)* general knowledge and current affairs;
*(iii)* essay writing.

**(3) Interview (25 marks) :-**

**(A)** Candidates securing a minimum of 50% marks in the written test shall be eligible to be called to appear for interview in the ratio of 1:8 of vacancies advertised in the respective categories.

**(B)** The interview shall be conducted by an Interview Board set up at each Unit by the Director General.

*(C)* After amalgamating the marks of physical fitness test and written test, as per the merit, the candidates will be called for interview in the ratio of 1:8 of vacancies advertised. All candidates who have secured the same marks as those of the lowest eligible candidate in each category as per the set ratio after amalgamating the physical fitness test and written test marks shall be called for the interview.

**Explanation:** After the written test , the marks of the physical and written tests will be amalgamated and candidates will be called for interview in the ratio of 1:8 in every category. If, for example, there are 10 vacancies in the S.C. category and 5 vacancies in the S.T. category, then 80 (8 x 10) candidates will be listed on merit of the amalgamated marks in the S.C. category and 40 (8 x 5) candidates will be listed in the S.T. category. However, all candidates in the S.C. category who have secured the same marks as the S.C. candidate at the 80th rank shall be eligible for interview. Similarly, all S.T. category candidates who have secured the same marks as the S.T. candidate ranking 40th will be eligible for interview under the S.T. category.

*(D)* The subjects for the interview will include the following, namely :-

*(i)* general personality of the candidate;

*(ii)* sports, N.C.C. or equivalent activities;

*(iii)* other special interests, e.g. motor driving, knowledge of computer operating or equivalent technical training or higher education.

*(4)* The Interview Board shall prepare a merit list from amongst the candidates based on the results of the three criteria enumerated at sub-rules *(1), (2)* and *(3)* of this rule.

**5.** Recruitment to the post of Police Constable in the Police Force shall be made by intimating and calling for names from the Employment Exchange or Social Welfare Officer / District Military Board and Training Centers conducted by the Tribal Development Department and inviting applications after giving advertisement thereof in Marathi, Hindi, Urdu and English language local newspapers having wide circulation and giving wide publicity through media as per the directions given by the General Administration Department from time to time. In addition, information pertaining to the recruitment shall be posted on the police website and displayed on office notice boards or announced on radio, television and employment bulletins. There shall be simultaneous recruitment in all Police Units in the State. The date shall be finalised by Director General. Application forms for this purpose shall be made

available at the offices of the Commissioner of Police/District Superintendent of Police/Commandant, State Reserve Police Force/Taluka Police Stations.

**6. Reservations :-**

***(1) Sports Category*** **:--**

*(A) (i)* Out of the total posts available for recruitment of Police Constables, 5% posts shall be reserved for sportspersons.

*(ii)* It shall be mandatory for all the sports category candidates to fulfill the standard requirements of physical, educational and other prescribed norms as laid down by Government from time to time subject to the relaxation as mentioned in Rule 3*(2)(C)*.

*(B)* **Eligibility:**

(i) Participation at International/National/All-India Inter-University levels in any of the sports disciplines listed below. Participation at national level will include School Nationals, Sub-Junior Nationals (Under-17 years), Junior Nationals (Under-19 years), Youth Nationals (Under-21 years) and Senior Nationals.

(ii) Medal winners at State level (Inter-District) Sports Tournaments in any of the sports disciplines listed below.

**<u>Sports disciplines</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| *(1)* | Archery | *(2)* | Athletics & Cross Country |
| *(3)* | Aquatics | *(4)* | Badminton |
| *(5)* | Boxing | *(6)* | Basketball |
| *(7)* | Gymnastics | *(8)* | Handball |
| *(9)* | Kho-Kho | *(10)* | Judo |
| *(11)* | Kabbadi | *(12)* | Rowing |
| *(13)* | Lawn Tennis | *(14)* | Shooting |
| *(15)* | Weight lifting | *(16)* | Table Tennis |
| *(17)* | Volleyball | *(18)* | Taekwondo |
| *(19)* | Wrestling | *(20)* | Hockey |
| *(21)* | Billiards & Snooker | *(22)* | Football |
| *(23)* | Karate | *(24)* | Power lifting |
| *(25)* | Body Building | *(26)* | Cricket |
| *(27)* | Kanoeing & Kayaking | *(28)* | Rugby |

*(C)* All certificates issued by recognized Sports Associations or Federations for competitions at State / All-India Inter-University / National / International levels should be duly got verified from the Director, Sports and Youth Services, Maharashtra State, Pune or his representative in the district.

*(2)* ***Women***:- 30% of the total posts available for recruitment of Police Constables shall be reserved for women. The terms and conditions governing this reservation shall be in consonance with the G.R. No. 82/2001/MSA-2000/CR-415/Desk-2. dated 25/5/2001 and any subsequent orders issued by Government from time to time.

***(3) Home Guards* :-** Out of the total posts available for recruitment to the post of Police Constable in the Police Force, 5% posts shall be filled in from amongst the members of Home Guards who have completed minimum three years service as Home Guards and possess the requisite educational and physical qualifications and age limit as per these rules.

*(4)* Ex-servicemen, project-affected persons and any other categories eligible as per the guidelines issued by the Government from time to time.

*(5)* All the categories enumerated in this rule shall be required to pass the eligibility criteria and obtain the requisite marks in the physical, written and interview tests prescribed for the post.

**7.** A person appointed to the post shall be required to pass examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing, those examinations.

**8.** Subject to sub-clause ***(a)*** of clause ***(A)*** of sub-rule ***(2)*** of rule 3, a person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

**9.** A candidate appointed to the post shall be required to complete the training prescribed for the post and have to pass concerned examinations within four chances, failing which his or her services would stand terminated. During this period, annual increments due shall be forfeited.

**10.** A psychological test to ascertain suitability and fitness for serving in the Police Force shall be conducted at the Police Training Schools. Candidates found unsuitable in the above test shall have their services terminated.

**11.** The candidates appointed to the post of Police Constable shall be governed by Bombay Police Manual, 1959, Bombay Police (Discipline and Appeal) Rules, 1956 and similar other rules prescribed by the Government from time to time.

By order and in the name of the
Governor of Maharashtra.

**P. T. Goud**
**Joint Secretary to Government**

Copy to :

The Director General & Inspector General of Police, Maharashtra State, Mumbai.

Special Inspector General of Police, Training & Special Units, Maharashtra State,Mumbai.

All Commissioners of Police.

All Range Inspector General of Police.

All Superintendents of Police.

All Commandants, State Reserve Police Force.

General Administration Department (Desk-12), Mantralaya, Mumbai.

Law & Judiciary Department (B-Branch), Mantralaya, Mumbai.